# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २४/०९/२०२४

विनयभंग :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भा.द.वी /सी आर पी.सी. | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बडनेरा अप क्र. ५८०/२०२४ कलम ७५, ७८, ३५२, भा न्या, सं. | कलम ३५४ अ, ३५४ ड ५०४ भा. द.वी. | अम. | अंदाजे दोन महिण्यापुर्वि दि. १०.०७.२०२४ ( फिर्यादीला निश्चीत तारीख माहिती नाही.) दा.ता. वेळ दि.२३.०९.२०२४ चे १८.०४ | एक महिला | जितेद्र पहलाजराय मोटवाणी वय ५५ वर्ष धंदा सरकारी नोकरी रा. पवन नगर नवी वस्ती बडनेरा अम. | हकीकत अशा प्रकारे आहे की मागिल दोन ते तीन माहिण्यापासुन आरोपी हा फिर्यादीस जवळीक साधुन जबरदस्ती बोलण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच येण्याजाण्याच्या रस्त्यामध्ये थांबुन जाणीवपुर्वक अभद्र हावभाव करतो व हातवारे करतो. आरोपीला फिर्यादी व तिचे नातेवाईकानी समजुन सांगितले तरी त्यामध्ये सुधारणा झाली नाही. उलट आरोपी हा फिर्यादी ही कामाच्य ठिकाणी जाताना पाठलाग करतो. अशा फि. चे जबानी रि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

पळवुने नेणे :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भा.द.वी /सी आर पी.सी | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बडनेरा अप क्र. ५७९/२०२४ कलम १३७(२), भा न्या, सं. | कलम ३६३ भा.द.वी. | अम. | घ. ता. वेळ् दि. २२.०९.२०२४ चे १२.४५ वा. दाखल ता.वेळ् - दि. २३.०९.२०२४ चे १७.२५ वा. | पिडीत मुलीचे वडील | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादीची मुलगी वय १२ वर्ष, ही सकाळी १०.३० वा. दरम्यान खेळायला जातो असे सांगुन घरुन निघुन गेली. त्यानंतर फिर्यादी १२.४५ वा. दरम्यान घरी परत आले तरी मुलगी घरी परत न आल्याने त्यानी तिचा शोध घेतला. परतु मिळुन न आल्याने तिला कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावुन पळवुन नेसे आहे. अशा फि. चे जबानी रि. वरुन सदरचा गुन्हा दाखल |

चोरी :-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भा.द.वी /सी आर पी.सी | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र ७८८/२०२४ कलम ३०३(२), २१८, २२१ बी एन एस | कलम ३७९,१८३,१८६ भा.द.वी. | मासोद ते वडगाव माहुरे रस्त्यावर अमरावती | दि.२०/०९/२०२४ चे दुपारी १२.०० वा दरम्याण<br><br>दि.२३/०९/२०२४ चे २१.४१ वा. | ज्ञानेश्वर गोविंदराव गावनेर वय ५६ वर्ष मंडळ अधिकारी वडाळी तहसिल कार्यालय अमरावती रा प्रिया टाऊनशिप अमरावती | १.ट्रक mh२७ bx३००९ चा चालक नामे संजु बाळाराम गोसावी रा परीहारपुरा वडाळी अमरावती २.ट्रक क्र mh२७bx३००९ चा मालक नामे रवि काळसकर रा गोपाल नगर अमरावती ३. ट्रक क्र mh ३१ m३३४४ चा चालक नामे नासीर खान मुस्तफा खान रा प्रविण नगर अमरावती ४. mh ३१ m ३३४४ चा मालक नामे वसीम खान मुस्तफा खान रा प्रविण नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि हे मा तहसीलदार यांचे आदेशाने अवैध गौण खणीज वाहतुकीवर लक्ष नियंत्रण ठेवण्याकरीता सोबत सहकारी असे मासोद ते वडगाव माहुरे रोडवर वाहणांची तपासणी करीत असताना मासोद कडुन वडगाव कडे येणा-या ट्रक mh२७ bx३००९ यास थांबवुन ट्रक मध्ये असलेल्या गौण खणीज बाबत रॉयल्टी मागितली असता त्याच्याकडे कोणत्याही प्रकारची रॉयल्टी/परवाना मिळुन आला नाही त्याच दरम्याण मासोद कडुन आणखी एक mh ३१ m ३३४४ हा तेथे आला त्याला थांबवुन परवाना बाबत विचारले असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले सदर दोन्ही ट्रकमध्ये अंदाजे ४ ब्रास मुरुम किं अं १०,०००/-रु चा गौण खणीज माल होता. सदर ट्रकचे चालक व मालक समोर पंचनामे करण्यात आले व दोन्ही ट्रक चालक व मालक यांना सदर ट्रक पुढील कार्यवाही करीता तहसील कार्यालय येथे जमा करण्यास सांगितले तर त्यांनी शासकिय कामात अडथळा निर्माण करुन दोन्ही ट्रक मध्ये चोरुन आणलेल्या मुरुम ट्रकसह घटनास्थळावरुन घेवुन पळुन गेले त्याबाबत सविस्तर अहवाल तहसीलदार अमरावती यांना त्याच दिवशी सादर केला दि.२३/०९/२०२४ रोजी मा तहसीलदार सा यांच्या कडुन दोन्ही ट्रक चे चालक व मालक यांच्यावर कार्यवाही करण्याबाबतचे पत्र प्राप्त झाल्याने सदर दोन्ही ट्रक चे चालक व मालक यांच्यावर कार्यवाही करीता रिपोर्ट दिला वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | नांदगाव पेठ अप क्र. ३१४/२०२४ कलम ३०३(२) भा.न्या.सं. | कलम ३७९ भा.द.वी. | फि यांचे नांदगावपेठ येथील पॉंवर हॉंऊस मागे शेतात | दि.२३/०९/२०२४ चे ११/००वा.<br>दाखल ता.वेळ<br>दि.२३/०९/२०२४ चे १८/५३ वा. | फैसल अहमद खान ५५ वर्ष रा.सर्किट हाऊस कॅंम्प अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फि चे शेत नांदगावपेठ येथील पॉंवर हॉंऊस मागे असुन फि ने मागील सहा वर्षापुर्वी टेक्सो कंमनीची मोटार कि.अ.६००० रु.ची विहीत लावली होती. नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फि चा.पुतन्या नामे साद अहमद खान हा शेतात गेला असता त्याला फि च्या शेतालील विहीरीतील मोटार मिळुन न आल्याने फि शेतात गेले व आजुबाजुला पाहणी केली व विचारपुर केली मिळुन आली नाही.सदर मोटार कोणीतरी अज्ञैत चोरट्याने चोरुन नेली . .अशा फि च्या जबानी रिपोर्ट सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पो स्टे सिटी कोतवाल अप क्र ३६०/२४ कलम ३०३(२) BNS | कलम ३७९ भा.द.वी. | रंगोली बार ॲन्ड रेस्टॉरंन्ट समोरील चौक अमरावती | दि २३/०९/२०२४ चे १८/३० वा दरम्यान<br><br>दा ता वेळ - दि २३/०९/२०२४ चे २१.०६ वा | एक महिला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी हया न्यु आझाद मंडळ गणपती पाहणे करीता गेली असता फि ची लहान मुलगी कडेवर असतांना फि च्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र अंदाजे २१ ग्रॅम वजनाचे किं अं ७४,०००/- रु कोणी तरी अज्ञात चोराने तोडुन चोरुन नेले. अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | पो स्टे सिटी कोतवाल अप क्र ३६१/२४ कलम ३०३(२) BNS | कलम ३७९ भा.द.वी. | रेल्वे स्टेशन चौक अमरावती | दि २३/०९/२०२४ चे १९/०० वा दरम्यान<br><br>दा ता वेळ - दि २३/०९/२०२४ चे २१.५४वा | एक महिला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी हया न्यु आझाद मंडळ गणपती पाहणे करीता गेली असता फि च्या गळयातील सोन्याचे मंगळसुत्र अंदाजे ०५ ग्रॅम वजनाचे किं अं १५,०००/- रु , २ सोन्याचे मंगळसुत्र अंदाजे ०३ ग्रॅम वजनाचे किं अं ८,०००/-असा एकुण २३,०००/- रु चा माल कोणी तरी अज्ञात चोराने तोडुन चोरुन नेले. अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ५ | पो स्टे सिटी कोतवाल अप क्र ३६२/२४ कलम ३०३(२)BNS | कलम ३७९ भा.द.वी. | रेल्वे स्टेशन उडडाण पुल ते राजकमल चौक दरम्यान अमरावती | दि २३/०९/२०२४ चे रात्री ०८/०० वा ते १०/०० वा दरम्यान<br><br>दा ता वेळ - दि २३/०९/२०२४ चे २३.२२ वा | संतोष कष्णराव आर्वीकर वय ४८ वर्ष रा नामदेव महाराज गल्ली गाडगेनगर अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद फिर्यादी हे विदर्भ राजा गणपती बघणे करीता राजकमल चौक येथे आले होते व गणपतीची आरती चालु होती आरती संपल्या नंतर फि ने गळयातील २० ग्रॅम सोन्याची चेन बघीतली असता दिसुन आली नाही तसेच पुनम हरीशंकर मिश्रा वय ३० वर्ष यांची सुध्दा सोन्याची चेन १२ ग्रॅम किं अं ३५,०००/- रु तसेच विशाल नांदुरकर वय २८ वर्ष यांची सुध्दा गळयातील २० ग्रॅम सोन्याची चेन किं अं ५०,०००/- रु , आकाश पाचंगे वय ३२ वर्ष याचे गळयातील १५ ग्रॅम सोन्याची चेन किं अं ४०,०००/- रु व हर्षद देशमुख वय ३० यांचे गळयतील ८० ग्रॅम चांदीची चेन किं अं २०,०००/- रु नमुद घ ता वेळी व घटनास्थाळावरुन कोणी तरी अज्ञात इसमाने तोडुन चोरुन नेली अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

स्त्रिअत्याचार :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदगाव पेठ<br>अप क्. ३१२/२०२४<br>कलम ४९८(अ) भादवी | अम. | दि.१२/०७/२०२१ चे १४/०० वा.ते दि. ०७/०६/२०२२ चे १२.००वा.<br>दाखल ता.वेळ<br>दि.२३/०९/२०२४ चे १६/१४ वा. | एक महिला | पिडीत महिलेचे ०३ नातेवाईक | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फि यांचे लग्ण आरोपी क्र.१ यांचे सोबत रितीरीवाजाप्रमाणे सन २०२१ मध्ये झाले असुन काही वर्ष त्यांाचा संसार सुरळीत सुरु होता.परंतु यातील आरोपी क्र. १ व २ हिने फिर्यीदीला तिचे माहेरुन पैसे आणण्याचे कारणावरुन त्रास देणे सुरु केले. त्यामुळे फि ने तिचे आईवडीला कडुन टप्या टप्याने पंचवीस हजार आणुन दिले. तरी आरोपी क्.१ व २ ने गल्ीच्य भाषेत शिवीगाळ केली.आरोपी क्र. ३ याने सुद्धा माहेरीवरुन पैसे आणण्यास मानसिक व शारीरीक त्रास दिला. अशा फि च्या जबानी रिपोर्ट व महीला सेल च्या कागदपत्रावरुन सदरचा गुन्हा दाखल |

ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | भा.द.वी /सी आर पी.सी | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र ७८७/२०२४ कलम २९६, ३५१(२) बी एन एस | कलम २९४, ५०६ भा.द.वी. | कल्याण नगर गल्ली नं १० अमरावती | दि.२२/०९/२०२४ चे २२.०० वा दरम्याण<br><br>दि.२३/०९/२०२४ चे १७.०२ वा | आकाश विनोदराव कविटकर वय २९ वर्ष रा कल्याण नगर गल्ली नं १० अमरावती | बाळु उर्फ भारत दिगांबर चौधरी रा कल्याण नगर गल्ली नं १० अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांचे वडीलांचे आरोपी सोबत जुणे भांडण असुन आरोपी फिर्यादीच्या परिवाराचा राग करतो व विनाकारण त्रास देवुन शिवीगाळ करतो त्यामुळे फिर्यादी यांनी यापुर्वीसुद्धा पो स्टे ला तक्रार दिलेली आहे. नमुद घटना ता वेळी फिर्यादी हे त्यांचे जिम बंद करुन घरी आले व मोटार सायकल घरासमोर लावत असताना आरोपी फि चे पाठीमागुन पायदळ आला व फि ला बघुन विनाकारण अश्लिल शिवीगाळ करुन धमकी दिली, फि चे काका अमोल कविटकर हजर होते, फि त्यांचेशी काहीही न बोलता घरात निघुन गेले , फि ला आरोपीचा नेहमीचा त्रास असुन दिलेल्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | नांदगावपेठ अप क्. ३१३/२०२४ कलम १२६(२),३५२,३५१(२), ३(५) भा.न्या.सं. | कलम ३४१,५०६,३४ भा.द.वी. | शेत शिवार शिवणगाव ता.तिवसा जि.अमरावती | दि.१७/०९/२०२४ चे १७/०० वा. दा.ता.वेळ दि.२३/०९/२०२४ चे १६/४५ वा. | दिलीप रामचेद मामकर वय ६८ वर्ष रा.शिवणगाव ता.तिवसा जि.अमरावती ह.मु.साईनगर अमरावती | १) पंजाबराव खरबडे वय ७० वर्ष २) एक महिला ३) निलेश खरबडे वय ३८ वर्ष ४) गजानन खरबडे वय ३५ वर्ष सर्व रा.शिवणगाव ति.तिवसा जि.अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे. की, यातील फि चे शेत ग्राम शिवगाव येथे असुन त्या शेतात ७०० मोसंबीचे झाडे लावले आहे. यातील फि ला त्याचे शेतातील मोसंबिचे माल ने आण करणे करीत आरोपी क्. १ च्या शेतातुन जावे लागते. यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी तहसिल कार्यालय तिवसा योचे वहीवाटीचा आदेशाप्रमाणे फि हा शेतीत मोसंबीचे माल ने आण करणे करीता लावेल मजुर व फि ची महिला नातेवाईक हे मोसंबिचे कँरेट भरुन जात असतांना यातील आरोपी क्र. १,२,३,४ असे शेतात हजर असुन त्यानी फि ला मोसंबिचे माल नेण्यापासुन आडविले .वरुन फि ने त्याना म्हटले की,आम्ही तहसिल कार्यालय तिवसा योचे वहीवाटीचा आदेशाप्रमाणे शेतातुन माल नेत आहे.तेव्हा यातील आरोपी नी फिर्यादीला शिवीगाळ केली व तुम्ही आमच्या शेतातुन माल कसे काय नेता अशी धमकी दिली.फि चा तब्बेत ठिक नसल्याने उशीरा पो.स्टे.रिपोर्ट देणेस आले. .अशा फि च्या जबानी रिपोर्ट सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | नांदगावपेठ अप क्.३१५/२०२४ कलम १४२ मपोका. | | रहाटगाव चौकात हाँटेल वऱ्हाडी तडका जवळ | दि.२३/०९/२०२४ चे १९/००वा. दाखल ता.वेळ दि. २३/०९/२०२४ चे २०/१४ वा. | सरतर्फ पोउपनी वाकडे सा.पो.स्टे.नांदगापेठे अमरावती | जय उर्फ प्रशीक प्रनीत वासनिक वय २१ वर्ष रा.मिलीद नगर रहाटगाव अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फि हे दि.२३/०९२०२४चे ०९/०० वा.ते २१/००वा.डे डिओ ड्युटी असतांना पेट्रोलीगं दरम्यान माहीती मीळाली की,यातील आरोपी हा हद्दपार तडीपार चा असुन आरोपास ताब्यात घेते वेळी उडवा उडवीचे उत्तर दिले वरुन नमुद आरोपी पो.स्टे.ला आणुन अटक केली.सदर आरोपीने मा.उपआयुक्त परीमंडळ १ यांचे आदेश क्र. पोउपआ/परी-१ /तडीपार /११३७/२०२४ दि.११/०७/२०२४ नुसार सदर आरोपीने चार महीने करीता अमरावती जिल्हा व शहर मधुन तडीपार चा आदेश असुन सुद्धा मिळुन आल्याने नमुद आरोपीवर कलम १४२ मपोका प्रमाणे गुन्हा नोद |

जुगार :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. नागपुरी गेट | अप नं ३५८/२०२४ कलम १२ अ, म.जु.का. | ग्राम सुकळी गजानन किराणा दुकाना समोर रोडवर अमरावती | दि.२३.०९.२४ चे १४.३० वा ते १५.४५ वा | दि. २३.०९.२०२४ चे १६.५९ | जीपो उपनी गजानन श्रीरामजी विधाते पो स्टे नागपुरीगेंट अमरावती | गजानन भिमराव मोरे वय ५२ वर्ष रा सुकळी ता जि अमरावती समजपत्रावर | हकिकत अशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी व पो स्टाफ असे पेट्रोलिंग करित असतांना गुप्त माहिती दाराकडुन माहिती मिळाली कि, नमुद घटनास्थळी मटका जुगार खेळणारे इसमावर रेड केली असता ते जागीच पकडुन पंचासमक्ष त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांने त्याचे नाव गजानन भिमराव मोरे वय ५२ वर्ष रा सुकळी असे सांगितल्यावरून त्याचे ताब्यातुन जुगार खेळाच्या कागदी चिठ्ठया ज्यावर मिलन डे छापील असलेले व एकुण ४१०रू नगदी व १० रू चा बॉल पेन अ सा एकुण ४२० रू चा माल मिळुन आल्याने नमुद आरोपीवर सदर चा गुन्हा दाखल |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | वा | शहर | | |
| २ | पो.स्टे. वलगाव | अप.न. २६४/२०२४ कलम १२ अ मु.जु.का. | ग्राम रेवसा | घ.ता. वेळ २३.०९.२०२४ चे १७.०० | दा.ता. वेळ २३.०९.२०२४ चे २०.३६ वा. | पो.हे.कॉ. ईश्या खांडे ब.न. १२०५ पो.स्टे. वलगाव | शहेशहा शेरू शहा वय ३४ रा. रेवसा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ.ता.वेळी व ठीकानी यातील फि यांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाले वरून नमुद आरोपी हा त्याचे घरा समोर जुगाराचा १ ते १० आकडया वरील वरली मटका नावाचा जुगार पैस घेवुन हाजजित चा खेळ खेळवुन पैस लावत होता त्याला पंचा समक्ष जुगार रेड केली असता वरली मटका आकडे लावनारे ईसम आमची चाहुल लागताच ते लोक तेथुन पळुन गेले वरली मटका आकडे लावनारा एक ईसम याला पैस व आकडे लिहीलेल्या चिठठया सह पोलीस अंमलदार यांचे मदतीने जागीच पकडले त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव शहेशहा शेरू शहा वय ३४ रा. रेवसा अमरावती असे सांगीतले त्याचे ताब्यातुन एकुन २३० रू वरली मटका चे आकडे आकडे लिहीलेल्या चिठठया एक बॉल पेन की.५ रू असा एकुन २३५ रू चा मुददेमाल जप्त |

**अकस्मात मृत्यु :-**

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| २ | पो.स्टे. राजापेठ ७६/२०२४ कलम १९४ | बालाजीप्लॉट २३/०९/२०२४चे १४.३० २३/०९/२०२४ चे १९.३९ | रवि रामलाल कुशवाह वय ५८ वर्ष | अंकित रामकिशोर यादव वय २९ वर्ष रा. बालाजी प्लॉट | फिर्यादी चे काकाचे घरी बालाजी प्लॉट येथ ३ ते ४ वर्षा पासुन मतृक भाड्याने राहत होता व शर्मा होटेल जवाहर गेट येथे पोळया करण्याचे काम करत होता दि. २३/०९/२०२४ रोजी मतृक ने फिर्यादीचे काकाचेघरी गळफास लावुन आत्महत्या केलेलेली दिसली |